# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट

दिनांक १०/१२/२०२२

**" मा. श्री. चद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा पालकमंत्री पुणे यांचे पिंपरी चिंचवड दौ-या दरम्यान घडलेल्या घटनेबाबत. "**

" मा. श्री. चद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा पालकमंत्री पुणे हे आज दिनांक १०/१२/२०२२ रोजी पिंपरी चिंचवड येथे मोरेश्वर शेडगे माजी नगरसेवक यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट देवुन ते श्री.मोरया गोसावी संजीवन समाधी सोहळ येथील कार्यक्रमास मोरेश्वर शेडगे यांचे निवासस्थानातुन निघाले असताना साधरणतः १७:५० वा.सुमारास पाय-यावरुन खाली उतरत असताना अचानकपणे समोरुन एक अनोळखी इसम जोरात पळत आला व मा. मंत्रीमहोदय यांच्या चेह-यावर काळया रंगाचे द्रव्य फेकले. द्रव्य फेकणा-या इसमाला व त्याचे इतर साथीदारांना लागलीच पोलीसांनी जागेवरच ताब्यात घेवुन त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांची नावे १) मनोज भास्कर घरबडे, वय ३४, रा. गोकुळ हॉटल जवळ पिंपरी, (समता सैनिक दल संघटक) २) धनंजय भाऊसाहेब इजगज वय २९ वर्षे रा. आनंदनगर चिचवड पुणे (समता सैनिक दल सदस्य) ३) विजय धर्मा ओव्हळ वय ४० वर्षे रा. आनंदनगर चिचवड पुणे (वंचित बहुजन आघाडी सचिव) असे असल्याचे निष्पन्न झालेले आहे. वरील इसमांनी कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो अशा घोषणा दिल्या. सदर बाबत चिंचवड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं. ५५३/२०२२ भादवि कलम ३०७, ३५३, २९४, ५००, ५०१, १२०(ब) ३४ क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंन्ट ॲक्ट कलम ७ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)/१३५ अन्वये गुन्हा दाखल करुन अधिक तपास चिंचवड पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.खराडे हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड.